|| श्री ||

# ईश्वराचे मानसशास्त्र

## श्रीभगवान पुरंदर गीता

Page No: 1

Date.

सत्ययुगाच्या आरंभीचा संवाद

प्रस्तावना - रहस्य अमरत्वाचे

सत्ययुगाच्या आरंभी जगताच्या निर्मात्या ब्रम्हदेवांनी नवीनच इंद्रपदी विराजमान होणाऱ्या भगवान पुरंदरांना त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी काही प्रश्न विचारले आणि त्या प्रश्नोत्तर किंवा संवादाच्या स्वरूपात हे दिव्य तत्त्वज्ञान उलगडले. या संवादातून विश्व, जीव, भक्ती, योग, धर्म - इतकेच नव्हे तर देवांमध्येही सर्वश्रेष्ठ अशा इंद्रपदाचे रहस्य उलगडते.

अनुक्रमणिका

(*) भाग एक - शंका निरसन ते प्रेरणा जागृती for (भक्त)

* दिवस एक - संशयोपनयनम् - दुविधानिवारण

→ जग हा फक्त आभास आहे. भगवान प्रकट झाले की तो आभास नष्ट होतो.

* दिवस दोन - जिज्ञासोपनयनम् - जिज्ञासानिवारण

→ सुख-दुःख समान मानणारा स्थिरचित्त जीव देवासमान होतो.

* दिवस तीन - प्रेरणाजागरणम् - प्रेरणाजागृती

→ महापापीही भक्तिभावाने भगवान पुरंदरास शरण येताच इंद्रपदास प्राप्त ठरतो.

(*) भाग दोन - यज्ञ, विश्वरूप आणि योगमार्ग for (देव)

* दिवस चार - यज्ञदर्शनम् - यज्ञरूपदर्शन

→ यज्ञ, प्रार्थना व स्तुती हाच सर्वोत्तम पूजामार्ग

→

Scanned with OKEN Scanner

* दिवस पाच - विश्वरूपदर्शनम् - विश्वरूपदर्शन
→ श्रीभगवान पुरंदर स्वतःच संपूर्ण विश्वरूप आहेत.

* दिवस सहा - योगाभ्यासः - योगाभ्यास
→ योगाने देवत्व मिळेल, पण इंद्रत्व देवांनाही निरंतर अभ्यासानेच.

(*) भाग तीन - आत्मसाक्षात्कार ते ज्ञानप्राप्ती for (संत)

* दिवस सात - स्वस्वरूपदर्शनम् - स्वस्वरूपदर्शन
→ स्वतः ब्रम्हदेवी जगन्माता यासुद्धा भगवान पुरंदरांचेच रूप.

* दिवस आठ - अक्षरब्रम्हप्राप्तिः - अक्षरब्रम्हप्राप्ती
→ ब्रम्हतत्व व इंद्रतत्त्व म्हणजे परस्परांचेच भक्त.

* दिवस नऊ - पुरंदरविद्याप्राप्तिः - पुरंदरविद्याप्राप्ती
→ श्री इंद्रदेवाची पुरंदरविद्या म्हणजे सर्वोच्च ज्ञान. दुःखनिवारण व सर्वोच्च असे इंद्रपद मिळवणे हेच जीवनाचे सर्वश्रेष्ठ ध्येय आहे.

(*) भाग चार - भक्ती व सत्याचा योग. for (नास्तिक)

* ~~विभूतिपदप्राप्त~~ दिवस दहा - विभूतिपदप्राप्तिः - विभूतीपद
→ सर्वसिद्धीदायक भगवान पुरंदर हे ब्रम्हदेवींचे शाश्वत पुत्र व बंधू आहेत.

* दिवस अकरा - सर्वज्ञयोगः - सर्वज्ञ तथा सर्वाग्नियोग
→ जेव्हा संपूर्ण ब्रम्हांड मानवाला स्वतःचेच स्वरूप वाटते.

* दिवस बारा - सत्ययोगः - सत्ययोग
→ भक्तच इंद्रस्वरूप आहेत.

Scanned with OKEN Scanner

(५) भाग पाच – त्रिगुणात्मक सृष्टी व प्रिय धाम (आस्तिक)

* दिवस तेरा – सृष्टेः प्रयोजनम् – सृष्टीप्रयोजन
→ विश्वनिर्मिती ही फक्त देवाच्या मनोरंजनासाठी व भक्तजनांना लीलामाधुर्य दाखविण्यासाठी.

* दिवस चौदा – त्रिगुणमूर्तिः – त्रिगुणमूर्ती
→ ॐ कारातून ब्रम्हा, विष्णू व कालाचा जन्म.

* दिवस पंधरा – सर्वोत्तमयोगः – सर्वोत्तम योग:
→ श्री पुरंदर यांचे प्रिय निवासस्थान म्हणजे गोलोक.

(६) भाग सहा – धर्म, श्रद्धा आणि राज्याभिषेक (राजा)

* दिवस सोळा – देवदुष्टयोर्भेदः – देव दुष्ट भेद
→ देव दानशील तर दुष्ट लोक स्वार्थी असतात.

* दिवस सतरा – श्रद्धा – श्रद्धा
→ भक्तांचे रक्षण स्वयं इंद्रपुरंदरच करतात.

* दिवस अठरा – राज्याभिषेकः – राज्याभिषेक
→ वर्तमान युगाचा शेवट झाल्यानंतर प्रल्हादवंशी राजा बळी इंद्रपदी बसेल.

"श्रीभगवान पुरंदर गीता" हा संवाद फक्त धार्मिक नाही तर मानवी जीवनाला दिशा देणारा आहे. यातून आपल्याला – भक्तीची शक्ती, इंद्रपदाचा महिमा, दानशीलता व धर्माचे महत्त्व तसेच विश्वनिर्मिती व अजरामर अशा इंद्रपदप्राप्तिचे रहस्य समजते."

Scanned with OKEN Scanner

# भाग एक
## शंका निरसन ते प्रेरणाजागृती
### ( भक्तांसाठीही )

① प्रकरण पहिले -

* विषय: प्रथम: - संशयोपनयनम् (कुविद्यानिवारण)

<u>ब्रम्हदेवी उवाच</u> -
हे श्रीपुरंदर! तव कल्याणं भवतु। यदा त्वं तिरोभवासि तदा जगत् केवलमाभासमिव दृश्यते। यदा पुनः प्रकटो भवासि तदा स एव आभासो नश्यति।

<u>श्रीपुरंदर उवाच</u> -
सत्यं देवी। यदा अहं प्रकटो भवामि, तदा मम योगमायायां बद्धोऽज्ञानिजीवः मयि आकर्ष्यते।

* मराठी भाषांतर
<u>ब्रम्हदेवी</u> : हे श्री पुरंदर, तुझे कल्याण होवो. तू अदृष्य असतोस तेव्हा हा संसार सत्य भासतो, पण तू जेव्हा प्रकट होतोस तेव्हा हा आभास नष्ट होतो.

<u>श्री पुरंदर</u> : होय देवी, मी प्रकट होऊ लागलो, की माझ्या या जगतरूपी योगमायेत अडकलेला अज्ञानी जीव माझ्याकडे आकर्षित होऊ लागतो.

* <u>अर्थस्पष्टीकरण</u> -
सत्ययुगाच्या पहिल्या दिवशी ब्रम्हदेवीने जगाच्या स्वरूपाविषयी संवाद साधला आहे. संसार हा प्रत्यक्ष नाही, तर तो एक <u>आभास</u> आहे.
- भगवान अदृश्य असले म्हणजे जीवाला जग हे खरे वाटते.
- पण श्रीभगवान प्रकट झाले की तो आभास नाहीसा होतो आणि <u>सत्याचे</u> दर्शन घडते.

श्रीपुरंदर म्हणतात की माझ्या योगमायेत अडकलेला जीव अज्ञानामुळे भटकतो, पण जसा मी प्रकट होतो तसा त्याला माझ्याकडे ओढा निर्माण होतो.

* तत्वज्ञान

1) संसाराचा आभास
→ जग हे अंतिम सत्य नाही, तर ते ईश्वराच्या उपस्थितीवर अवलंबून आहे.

2) योगमाया
→ ईश्वराची लीला अशी आहे की ती अज्ञान्याला खोटे हे खरे वाटू देते.

3) भक्तीचे आकर्षण
→ जेव्हा ईश्वर प्रकट होतात, तेव्हा भक्तांच्या अंतःकरणात आपोआपच त्यांच्याकडे आकर्षण निर्माण होते.

* जीवनातील उपयोग

1) शंका आणि भ्रम निरसन
→ आपल्या जीवनात अनेक वेळा आपल्याला जग फार खरे वाटते, पण अध्यात्म सांगते की हे सर्व क्षणभंगुर आ

2) देवाची अनुभूती
→ जेव्हा आपण ध्यान, प्रार्थना किंवा भक्ती करतो तेव्हा भगव आपल्यासाठी प्रकट होतात आणि आपले अज्ञान नाहीसे करतात.

3) आकर्षणाचा नियम
→ आपण जसे विचार करतो तसेच आपल्या मनाला आकर्षण निर्माण होते. देवाकडे मन लावले, की आपला आत्मा त्यांच्या आपोआप खेचला जातो.

* आता आपण पुढील प्रकरणात देवासारखे कसे व्हावे ते शिकू.

Scanned with OKEN Scanner

② प्रकरण दुसरे

* दिवस: द्वितीय : - जिज्ञासोपनयनम् (जिज्ञासानिवारण)

ब्रम्हदेवी उवाच -
प्रभो! ये देवमनुष्यराक्षसाः सुखदुःखयोः समदर्शिनः तान् त्वं स्वसमानान् करोति किम्?

श्रीपुरंदर उवाच -
मया जातः प्रत्येकः जीवः मम स्वरूपमेव। ते सर्वेऽपि इन्द्रपदभोगाय नित्यं योग्याः।

* मराठी भावांतर
ब्रम्हदेवी : प्रभु, जे देवता, मानव आणि राक्षस योनीतील जीव सुखदुःख समान मानून दोन्ही अवस्थांमध्ये संयमित राहतात त्यांना तुम्ही तुमच्यासारखेच बनवता का?

श्री पुरंदर : माते, तुमच्याद्वारे जन्मलेला प्रत्येक जीव हा माझेच स्वरूप आहे. सर्व जीव माझ्या या इंद्रपदाचा उपभोग घेण्यास नेहमीच पात्र असतात.

* अर्थस्पष्टीकरण
दुसऱ्या दिवशी देवीने एक जिज्ञासा व्यक्त केली- जो जीव सुख आणि दुःख या दोन्ही अवस्थांना समान समजून स्थितप्रज्ञ राहातो, त्याला परमेश्वर स्वतःसारखा बनवतात का?
श्रीपुरंदर याचे उत्तर देतात की,
- प्रत्येक जीव हा माझाच अंश आहे.
- जो जीव समभाव ठेवतो तो इंद्रपदाचा अधिकारी आहे
- सुखदुःखात न ~~खचणारा~~ गुंतणारा जीव खऱ्या अर्थाने देवत्वास पात्र होतो.

Scanned with OKEN Scanner

## * तत्त्वज्ञान

1) समत्वभाव
→ सुख-दुःख, यश-अपयश, लाभ-हानी, जन्म-मृत्यू या द्वंद्वांमध्ये स्थिर राहणे हे दैवी लक्षण आहे.

2) जीव आणि ईश्वर
→ प्रत्येक जीव देवाचाच अंश आहे, म्हणूनच आपल्यात दैवी क्षमता सुप्तावस्थेत असतेच.

3) इंद्रपदाचा अधिकारी
→ समत्वाने जगणारा जीव इंद्रपद व अमरत्वाच्या सर्वोच्च स्थानाचा भोग घेण्यास योग्य ठरतो.

## * जीवनातील उपयोग

1) सुख-दुःखात समता
→ आपल्याला जीवनात सुख मिळाले की आनंदी व्हावे हे नैसर्गि आहे, परंतु कर्मधर्मसंयोगाने दुःख आलेच तर खचून जाऊ नये. दुःख तात्पुरतेच असते, आनंदात असणे हाच आत्म्याच शाश्वत स्वभाव आहे.

2) स्थिरता
→ मनाचे संतुलन राखणारा मनुष्य मोठमोठ्या संकटांमध्येही टिकून राहतो.

3) दैवत्वाकडे वाटचाल
→ ईश्वरावर संपूर्ण विश्वास ठेवून समभावाने जीवन जगणार संत सज्जन हा माणसांतील देवच असतो.

* आता आपण पुढील प्रकरणात एखादा महापापीसुद्धा देवासारखा कसा होऊ शकतो ते शिकू.

Scanned with OKEN Scanner

③ प्रकरण तिसरे

* दिवसः तृतीयः - प्रेरणाजागरणम् (प्रेरणाजागृती)

ब्रम्हदेवी उवाच -
हे दयासिन्धो पुरंदर! पापी जीवः कथं इन्द्रपदस्य अधिकारी भवेत्?

श्रीपुरंदर उवाच -
हे निष्पापे! यः भक्तिभावेन मयि शरणं याति, तं मम उत्तराधिकारीं करोमि।

* मराठी भाषांतर
ब्रम्हदेवी: हे दयामूर्ती पुरंदर, एक पापी जीव इंद्रपदाचा अधिकारी कसा होऊ शकतो?

श्री पुरंदर: हे निष्पाप देवी, जो कोणी मला भक्तिभावाने शरण येतो (तो महापापी असला तरी) त्याला मी माझा उत्तराधीकारी नेमतो.

* अर्थस्पष्टिकरण
तिसऱ्या दिवशी ब्रम्हदेवीने येथे अत्यंत महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे.- "पापी जीव दैवी पदाला पात्र होऊ शकतो का
सामान्यतः आपल्याला वाटते की पापी व्यक्तीला दैवी स्थान मिळू शकत नाही. पण भगवान पुरंदर सांगतात
• पाप असो वा पुण्य, जो भक्त शुद्ध भक्तिभावाने शरण येतो, त्याला मी स्वीकारतो.
• भक्तीभावाने शरण आलेला महापापीही शुद्ध होऊन दैवीपदाला तसेच इंद्रपदालाही पात्र होतो.

★ तत्त्वज्ञान

1> पाप आणि उद्धार
→ पाप हा केवळ जीवाच्या अज्ञानाचा परिणाम आहे. ईश्वरी कृपा मिळाली की पाप धुऊन निघते.

2> भक्तीची शक्ती
→ अनन्य भावाने केलेली भक्तीच माणसाला ईश्वराच्या समीप नेते.

3> शरणागती
→ अहंकाराचा त्याग करून जेव्हा जीव देवाला "मी तुझा आहे" असे म्हणतो, तेव्हाच तो दैवी पदाला पात्र ठरतो.

★ जीवनातील उपयोग

1> आत्मविश्वास
→ आपण कितीही चुका केलेल्या असल्या, तरीही मनापासून शरण गेलो तर देव आपल्याला माफ करतात.

2> सकारात्मक दृष्टी
→ दुसऱ्यांच्या फक्त दोषांकडेच न पाहता त्यांच्या सद्गुणांकडेही पाहणे आवश्यक आहे

3> आशेचा किरण
→ अगदी गुन्हेगारही भक्तिभावाने देवाला शरण गेल्यावर दैवी पदाला पात्र होतो, ही गोष्ट प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.

★ आता आपण पुढील प्रकरणात श्री इंद्रभगवान पुरंदर काय केल्याने प्रसन्न होतात ते शिकू.

Scanned with OKEN Scanner

# भाग दोन
## यज्ञ, विश्वरूप आणि योगमार्ग
### (देवांसाठीही)

Page No: 10
Date.

⑥ प्रकरण चौथे

* दिवसः चतुर्थः – यज्ञदर्शनम (यज्ञरूपदर्शन)

ब्रम्हदेवी उवाच –
हे देवेंद्र! तव पूजा कथं कार्याऽस्ति?

श्रीपुरंदर उवाच –
~~प्रार्थना~~ यज्ञः, प्रार्थना मम गुणस्तुतिश्च – एते मम तुष्टये श्रेष्ठा उपायाः।

* मराठी भावांतर
ब्रम्हदेवी : हे देवेंद्र, आपली पूजा कशी करावी?

श्री पुरंदर : यज्ञ, प्रार्थना आणि माझ्या रूपांची व गुणांची स्तुती – ही मला प्रसन्न करण्याची सर्वश्रेष्ठ साधने व उपाय आहेत.

* अर्थस्पष्टिकरण
चौथ्या दिवशी भगवतीने एक मूलभूत प्रश्न विचारला: "देवाची पूजा नेमकी कशी करावी?"
श्री पुरंदर यांचे उत्तर सोपे पण अतिशय गहन आहे.
• यज्ञ म्हणजे केवळ अग्निहोत्रच नव्हे, तर स्वार्थत्याग आणि समर्पण होय.
• प्रार्थना म्हणजे हृदयातून निघणारा देवाबरोबरचा संवाद होय.
• स्तुती म्हणजे देवाच्या रूपाचे, गुणांचे व लीलांचे कृतज्ञतेने केलेले वर्णन होय.

Scanned with OKEN Scanner

* तत्त्वज्ञान

1) यज्ञाचा खरा अर्थ
→ यज्ञ म्हणजे आपल्या अहंकाराचे समर्पण आणि इतरांच्या हितासाठी केलेला स्वार्थत्याग

2) प्रार्थना
→ शब्दांपेक्षा भावना महत्त्वाच्या. खरी प्रार्थना म्हणजे आपल्या आत्म्याचा देवाशी संवाद.

3) कृतज्ञताभाव
→ देवाच्या गुणांची स्तुती मन शुद्ध करते. नुसत्या नामस्मरणाने सुद्धा मनातील नकारात्मकता नाहीशी होते.

* जीवनातील उपयोग

1) यज्ञाचे आचरण
→ दैनंदिन जीवनातही यज्ञ होऊ शकतो – आपण केलेली निःस्वार्थ सेवा, इतरांसाठी केलेला त्याग. इत्यादी.

2) प्रार्थना
→ सकाळ-संध्याकाळ मनापासून केलेली छोटी प्रार्थनाही आपल्याला दिव्य ऊर्जा देते.

3) स्तवन
→ गीतेचे पठण, पोथी पुराणांचे पारायण, भजन, स्तोत्रमंत्र, नामजप – ही सर्व स्तुतीचीच रूपे आहेत जी मनाला शांती देतात.

* आता आपण पुढील प्रकरणात देवाकडून सर्वकाही कसे मिळवावे याचे रहस्य शिकू.

Scanned with OKEN Scanner

(5) प्रकरण पाचवे

* दिवस: पंचम: – विश्वरूपदर्शनम् (विश्वरूपदर्शन)

ब्रम्हदेवी उवाच –
हे परमश्रेष्ठ! यो मां तुष्टावति, स सर्वं प्राप्नोति किम्?

श्रीपुरंदर उवाच –
आम्! अहमेव विश्वरूप:। मया भक्तानां सर्वेऽभिलाषा: पूर्यन्ते।

* मराठी भाषांतर
ब्रम्हदेवी: हे परमश्रेष्ठा, जो प्राणी तुम्हाला प्रसन्न करतो, त्याला सर्व काही मिळते, हे खरे आहे का?

श्री पुरंदर: होय! मी स्वत:च विश्व आहे. माझ्या भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण करण्यास मी समर्थ आहे

* अर्थस्पष्टिकरण
पाचव्या दिवशी देवीने विचारलेला प्रश्न साधा आहे, पण त्यामागे एक गूढ आहे.
- "जो तुम्हाला प्रसन्न करतो, त्याला सर्वकाही मिळते का? भगवान पुरंदर उत्तर देतात –
- होय, कारण ते स्वत:च हे विश्व आहेत.
- भक्ताने जर त्यांना प्रसन्न केले तर संपूर्ण विश्वच त्याच्या पायाशी येते.
- देव हा अखिल विश्वाचा अधिष्ठाता असल्याने, त्याच्याकडून काहीही अशक्य नाही.

Scanned with OKEN Scanner

* तत्वज्ञान

1) विश्वरूपत्व
→ देव फक्त एका मूर्तीपुरते किंवा एका अवतारापुरतेही मर्यादित नाहीत, तर संपूर्ण विश्व त्यांचेच रूप आहे.

2) भक्तांच्या इच्छा
→ भक्तांच्या इच्छा श्री इंद्रदेव पुरंदर पूर्ण करतात, पण त्या इच्छा शुद्ध व कल्याणकारी असल्या पाहिजेत.

3) देवाशी एकात्मता
→ जेव्हा भक्त देवाला प्रसन्न करतो, तेव्हा तो ब्रम्हांडाशीही एकरूप होतो.

* जीवनातील उपयोग

1) भक्तीतील विश्वास
→ आपली प्रार्थना व्यर्थ जात नाही, कारण देव सर्वव्यापी आहे.

2) सकारात्मक इच्छाशक्ती
→ आपल्या इच्छा या शुद्ध, प्रेममय व सुखकारक असल्या की त्या लवकर पूर्ण होतात.

3) जगाताशी नाते
→ प्रत्येक गोष्टीत देव पाहिला तर मनात भय उरत नाही व श्रीभगवान विश्वातील सर्व संपत्ती आपल्या उपयोगासाठी उपलब्ध करतात.

* आता आपण पुढील प्रकरणात सर्व देवतांनाही इंद्रपद कसे मिळवावे लागते ते शिकू.

Scanned with OKEN Scanner

⑥ प्रकरण सहावे

★ दिवसः षष्ठः- योगाभ्यासः (योगाभ्यास)

ब्रम्हदेवी उवाच -
हे सर्वज्ञ! देवत्वं च इंद्रत्वं च कथं भिद्यते ?

श्रीपुरंदर उवाच -
योगेन देवत्वं लभ्यते, किन्तु इन्द्रत्वं निरन्तराभ्यासेन देवैरपि साध्यते।

★ मराठी भाषांतर
ब्रम्हदेवी : हे सर्वज्ञा, देवत्व ~~ब~~ आणि इंद्रत्व यात नेमका काय फरक आहे.

श्री पुरंदर : योगाने देवत्व प्राप्त होते, पण इंद्रत्व (स्वर्ग) हे देवांनाही निरंतर अभ्यासानेच प्राप्त करावे लागते.

★ अर्थस्पष्टिकरण।
सहाव्या दिवशी जगदंबेने एक गंभीर तात्त्विक प्रश्न विचारला आहे.
- देवत्व म्हणजे दातृत्व, आणि इंद्रत्व म्हणजे अधिपत्य
- देव होण्यासाठी योगमार्ग आवश्यक आहे.
- पण इंद्रत्व म्हणजेच नेतृत्व, सामर्थ्य, चक्रवर्ती सम्राटपद यासाठी सातत्यपुर्ण अभ्यास व प्रयत्न आवश्यक असतात

श्री पुरंदर सांगतात की देवत्व मिळणे हे योगमार्गा: मुळे शक्य आहे, पण इंद्रपद हे विशेष स्थान आहे जे केवळ सातत्यपूर्ण तप, साधना व जबाबदारीनेच प्राप्त करता येते.

Scanned with OKEN Scanner

* तत्त्वज्ञान

1) देवत्व आणि योग

→ योग म्हणजे आत्म्याचा परमात्म्याशी संयोग. यामुळे एक सामान्य जीवही देव बनतो.

2) इंद्रत्व आणि साधना

→ इंद्रत्व म्हणजे फक्त पद किंवा सत्ता नव्हे, तर संपूर्ण विश्वाच्या कार्यभाराची जबाबदारी. असे हे इंद्रपद मिळवण्यासाठी केवळ साधनाच नव्हे तर सातत्य, धैर्य, संयम आणि शौर्य आवश्यक आहे.

3) अभ्यास

→ योगमार्ग हा आंतरिक प्रवास आहे. इंद्रपदासाठी बाह्य व आंतरिक दोन्ही परीक्षांतून सतत जावे लागते.

* जीवनातील उपयोग

1) आंतरिक विकास

→ योगाने आत्मशांती मिळते. हा मार्ग मोक्ष व देवत्व मिळवून देतो.

2) जबाबदारीची जाणीव

→ इंद्रदेवासारखे नेतृत्व मिळवायचे असेल, तर सातत्यपूर्ण परिश्रम व शिस्त आवश्यक आहे.

3) संतुलन - देवत्त्व आध्यात्मिकतेसाठी तर इंद्रत्व अधिकारास आवश्यक आहे.

* आता आपण पुढील प्रकरणात अनेक विश्वांना जन्म देणारी ब्रम्हशक्ती व विश्वाचे नेतृत्व करणारी इंद्रशक्ती यांचे रहस्य शिकू.

Scanned with OKEN Scanner

भाग तीन

आत्मसाक्षात्कार ते ज्ञानप्राप्ती



(संतांसाठीही)

(7) प्रकरण सातवे

* दिवस: सप्तम: - स्वस्वरूपदर्शनम् (स्वस्वरूपदर्शन)

ब्रम्हदेवी उवाच -

हे प्रभो! अनेकान् इन्द्रान दृष्ट्वा अहं मन्ये यत् सर्वं विश्व पुरंदर एव।

श्रीपुरंदर उवाच -

भवत्यादिभि: मातृदेव्य: सृष्टिकर्म निरंतरं प्रवर्तते। मातृदेव्यै नमः

* मराठी भाषांतर

ब्रम्हदेवी: देवा, अनेक इंद्रदेव व इंद्रदेवींना पाहात पाहात आता तुझा साक्षात्कार झाला. मला समजले आहे की हे विश्व म्हणजे इंद्र पुरंदरच आहे.

श्री पुरंदर: तुमच्यासारख्या मातांमुळेच विश्वोत्पत्तीचे कार्य निरंतर सुरू राहते. मातृदेवतेचा विजय असो!

* ~~अर्थस्पष्टिकरण~~ अर्थस्पष्टिकरण

सातव्या दिवशी ब्रम्हदेवीला एक गूढ अनुभव आला

• तिने आजवर इंद्रपदी बसलेल्या अनेक व्यक्तींना पाहिले ह

• पण जेव्हा भगवान पुरंदरांचा साक्षात्कार झाला, तेव्हा तिला जाणवले की 'हे संपूर्ण विश्व म्हणजे पुरंदरच आहे!

त्यावर भगवान म्हणतात की विश्वाची उत्पत्ती मातृशक्तीमुळे होते व सृष्टीचा प्रवाह अखंड सुरू राह

* तत्वज्ञान

1) सर्वत्र देव
→ देव एखाद्या स्वरूपापुरते मर्यादित नाहीत. अखिल विश्वच त्यांचे स्वरूप आहे.

2) सृष्टीतील मातृशक्ती
→ विश्वनिर्मिती ही मातृशक्तीशिवाय अपूर्ण आहे. मातृशक्तीच विश्वाला गती देते.

3) आत्मसाक्षात्कार
→ खरी अनुभूती आली की आपल्याला दिसते - जगात जे काही आहे ते सर्व आपल्यातच आहे.

* जीवनातील उपयोग

1) सर्वत्र देवाचा अनुभव
→ आपण जेव्हा प्रत्येक गोष्टीत ईश्वर पाहू लागतो, तेव्हा आपले मन द्वेष, अहंकार आणि भीतीपासून, एकंदरीतच षड्रीपूंपासून मुक्त होते.

2) स्त्रीशक्तीचा गौरव
→ मातृशक्ती हेच सृष्टीचे मूळ आहे याची जाणीव आप. जीवनाला संतुलन देते.

3) आत्मजागर
→ देवाला केवळ मंदिरे व प्रतिमांमध्येच पाहू नये, तर प्रत्येक जीवात त्यांचा अनुभव घ्यावा.

* आता आपण पुढील प्रकरणात पाहू की माता आणि पुत्र हे फणमेकांचे भक्त कशाप्रकारे असतात.

(8) प्रकरण आठवे

(8)

* दिवसः अष्टमः - अक्षरब्रम्हप्राप्ति (अक्षरब्रम्हप्राप्ती)

ब्रम्हदेवी उवाच -
भगवन्! अहं तव प्रसन्ना। मम तेजः ब्रम्हपदं च तुभ्यमर्पयामि।

श्रीपुरंदर उवाच -
माता! अहमपि नित्यं तव पूजां करिष्यामि।

* मराठी भाषांतर

ब्रम्हदेवी : भगवान, मी तुमच्यावर प्रसन्न आहे, मी माझ्या संपूर्ण प्रकाश आणि ब्रम्हपदही तुम्हाला अर्पण करते.

श्री पुरंदर : माते! मीही सदैव तुमचीच भक्ती करीत राहीन

* अर्थस्पष्टिकरण

आठव्या दिवशी ब्रम्हदेवी स्वतःचा सर्वोत्कृष्ट वर भगवान पुरंदरांना देतात.

- तेज - म्हणजे ज्ञान, विद्या आणि तेज
- ब्रम्हपद - म्हणजे अखंड, अक्षय, शाश्वत ब्रम्हरूपता

भगवान उत्तर देतात की तेही मातृशक्तीची भक्ती निरंतर करीत राहतील.

हे परस्पर समर्पण आणि आदरभाव दर्शवितो.

★ तत्त्वज्ञान

1) ब्रम्हपदाचे अर्पण

→ ब्रम्हदेवांनी आपले विश्वोत्पत्तीचे ज्ञान, तेज व आपले ब्रम्हपदही देवाला अर्पण केले म्हणजे संपूर्ण समर्पण केले.

2) भक्तीतील समता

→ देव फक्त भक्तांच्या समर्पणाचा स्वीकारच करत नाहीत तर ते स्वतःही आपल्या भक्तांची भक्ती करतात. याने सहभागी भाव प्रकट होतो.

3) अक्षरब्रम्ह

→ अक्षरब्रम्ह म्हणजे शाश्वत, अविनाशी तत्त्व. पुराणपुरुष व मातृका यांचे हे ऐक्यच विश्वाचा पाया आहे.

★ जीवनातील उपयोग

1) समर्पण

→ नात्यात, साधनेत आणि भक्तीत पूर्ण समर्पण केल्यावरच खरी ऐक्यता निर्माण होते.

2) आदर

→ ईश्वरालाही मातृशक्तीचा आदर आहे. यावरून स्त्री ही किती सन्मान-नीय आहे याचा विचार आपण केला पाहिजे.

3) भक्तीमार्ग

→ भक्ती ही एकतर्फी नसून भक्त व त्याचा देव यांच्यातील परस्पर आदर व प्रेमाने ती बळकट होते.

★ आता आपण पुढील प्रकरणात शिकू की मानवी जीवनाचे परमोच्च ध्येय कोणते आहे.

(9) प्रकरण नववे

★ दिवसः नवमः - पुरंदरविद्याप्राप्तिः (विद्याप्राप्ति)

ब्रम्हदेवी उवाच -

~~भक्स्य~~ महाराजः मया सर्वं प्राप्तम्। तव भजनात् किं नुतनं लभ्यते

श्रीपुरंदर उवाच -

भवत्या पुरंदरविद्या प्राप्ता भविष्यति।

★ मराठी भाषांतर

ब्रम्हदेवी : महाराज, तुमची भक्ती केल्यावर मला असे काय नवीन मिळेल? माझ्याकडे सर्वकाही आहे.

श्री पुरंदर : तुम्हाला (सर्वश्रेष्ठ अशी) पुरंदरविद्या प्राप्त होईल

★ अर्थस्पष्टिकरण

नवव्या दिवशी देवीला वाटले, "माझ्याकडे तर संपूर्ण सृष्टी शक्ती आहे, मग इंद्रदेव पुरंदर यांच्या पूजेतून मला अजून नवी काय मिळणार?

भगवान उत्तर देतात - सर्वकाही असूनही एक गोष्ट अद्याप अपूर्ण आहे, ती म्हणजे तेतूत्वसिद्धी देणारी पुरंदरवि

• सृष्टीची निर्मिती - संचालन - प्रलय यावर अधिपत्य मिळविण्याची क्षमता श्रीभगवान पुरंदरांच्या पूजेमुळे - भक्तीमुळे प्राप्त होते.

Scanned with OKEN Scanner

* तत्त्वज्ञान

१) विद्या आणि संपत्ती
→ बाह्य वैभव व शक्ती असूनही खरी पूर्तता आत्मविद्येनेच होते.

२) इंद्रविद्या
→ ही विद्या म्हणजे भक्तियोग आणि समर्पणातून मिळणारा परमज्ञानाचा मार्ग.

३) ज्ञानाची अनंतता
→ सृष्टिकर्त्या देवीमातेलाही अजून मिळवण्यासारखे ज्ञान आहे, हे दाखवते की ज्ञानाला सीमा नाही.

* जीवनातील उपयोग

१) संपत्तीपेक्षा ज्ञान श्रेष्ठ
→ भौतिक साधने मुबलक असली तरी खरी समृद्धी ज्ञानानेच येते.

२) सतत शिकण्याची वृत्ती
→ कितीही उंची गाठली तरी अजून भरपूर शिकण्यासारखे असते

३) आध्यात्मिक पूर्तता
→ बाह्य यश असूनही आंतरिक शांती व आत्मज्ञानाशिवाय जीवन अपूर्णच असते.

* आता आपण पुढील प्रकरणात सर्व सिद्धींची पराकाष्ठा कशी होते ते शिकू.

Scanned with OKEN Scanner

# भाग चार
## भक्ती व सत्याचा योग

(संतोसाहीही)

(10) प्रकरण दहावे

* दिवसः दशमः – विभूतिपदप्राप्तिः (विभूतीपद)

ब्रम्हदेवी उवाच –
हे कृष्णरूप! मयि महान् वात्सल्यभावः जायते।

श्रीपुरन्दर उवाच–
माता! अहमेव तव नित्यः पुत्रो भ्राता च।

* मराठी भाषांतर

ब्रम्हदेवी : हे श्रीकृष्णा! तुझ्याबद्दल माझ्या मनात अपार वात्सल्य जागृत होत आहे!

श्री पुरंदर : माते, कारण मीच तुझा जन्मोजन्मीचा मुलगा व भाऊ आहे.

* अर्थस्पष्टिकरण

दहाव्या दिवशी श्री ब्रम्हदेवीला पुरंदराविषयी मातृवत वात्सल्य जागृत झाले.

भगवान म्हणाले – "मीच तुमचा पुत्र व भाऊ आहे."

• देव आणि त्याच्या भक्ताचे नाते रक्ताच्या नात्याप्रमाणे निकटचे असते.

★ तत्वज्ञान

१) भक्त - भगवानाचे नाते
→ देव फक्त पूजेचा विषय नाही, तर तो कुटुंबातील सदस्यच असतो.

२) वात्सल्य भक्ती
→ हे भक्तीचे सर्वोच्च स्वरूप आहे, ज्यात भक्त देवाला स्वतःचा पुत्र मानतो.

३) सिद्धीप्राप्ती (उदा. अष्टसिद्धी)
→ जेव्हा भक्त आपल्या हृदयात देवाला कायमस्वरूपी स्थान देतो, तेव्हा सर्व सिद्धी आपोआपच प्रकट होतात. रामभक्त रुद्रावतारी श्री हनुमान याचे परमश्रेष्ठ उदाहरण आहेत.

★ जीवनातील उपयोग

१) देवाशी आत्मीय नाते
→ देवाशी भीतीचे नाते न ठेवता आत्मियता व ममता ठेवावे हे नाते पालक - पाल्य, भावंडे किंवा मित्रवतही असू शकते

२) वात्सल्ययुक्त प्रेम.
→ आपल्या पालकांचे जसे आपल्यावर निस्वार्थ प्रेम असते असेच वात्सल्य देवाशी केले तर देवही स्वतःला आपल्या भक्ताच्या प्रेमबंधनात बांधून घेतात.

३) निकटता
→ देव कुठे दूर परलोकी नसून ते नेहमी आपल्यासोबतच आहे

★ आता पुढील प्रकरणात पाहू की एखादा सामान्य मनुष्यही स्वतःला विश्वरूप कसे बनवू शकतो.

Scanned with OKEN Scanner

(11) प्रकरण अकरावे

* दिवसः एकादशः - सर्वाग्नियोगः (सर्वज्ञता)
ब्रम्हदेवी उवाच -
हे अग्निमय पुरुषः सर्वज्ञत्वः किमिति ?

श्रीपुरंदर उवाच -
यदा जीवः सर्वं विश्वं स्वस्वरूपं मन्यते, तदा सर्वज्ञत्वं भवति ।

* मराठी भाषांतर
ब्रम्हदेवी : हे अग्नीमय पुराणपुरुषा, 'सर्वज्ञता' म्हणजे नेमके काय ?

श्री पुरंदर : जेव्हा एखादा जीव संपूर्ण ब्रम्हांड स्वतःचेच रूप मानू लागते त्या अवस्थेला 'सर्वज्ञता' प्रकटते.

* अर्थस्पष्टिकरण
अकराव्या दिवशी महादेवीने विचारलेला प्रश्न अग्नितत्त्वाशी निगडित आहे.
भगवान स्पष्टीकरण देतात की सर्वज्ञता म्हणजे बाह्य ज्ञानरूप अग्नि नव्हे, तर आध्यात्मिक ज्ञानाग्नी.
• जेव्हा साधक भक्ताला ही सृष्टी स्वतःचेच रूप वाटते व तो परमेश्वरी विश्वरूपाशी एकरूप होतो तेव्हा सर्वाग्नीयोग साधला जातो.

Scanned with OKEN Scanner

* तत्त्वज्ञान

१) अग्नीचे प्रतीक
→ अग्नी हे परिवर्तन व शुद्धीकरणाचे प्रतीक आहे. (ज्ञानाग्नी)

२) सर्व - अग्नि - योग
→ याचा अर्थ असतो " मी आणि विश्व " वेगळे नाही हा अनुभव घेणे.

३) एकात्मतेचा अनुभव
→ सर्व प्राणी, लोक, तत्त्वे, देवी-देवता ही माझीच रूपे आहेत - अशी अनुभूती म्हणजे सर्वाग्नि.

* जीवनातील उपयोग

१) एकात्मभाव
→ आपण वेगळे नसून संपूर्ण समाजाशी- जगताशी संलग्न आहोत, याची जाणीव झाली की इतरांबद्दल असलेला द्वेष व नकारात्मक भावना नाहीशा होतात.

२) शुद्धीकरण
→ मनातील लोभ, अहंकार आणि मत्सर (व षड्रिपू) या सर्वाग्नीमध्ये जळून भस्म होतात.

३) दुःखदर्शन
→ दुसऱ्याला त्रास व दुःख देणे म्हणजे स्वतःलाच दुखावणे (कर्मबंधन) होय.

* आता पुढील प्रकरणात आपण सत्यवचनाचे महत्त्व जाणून घेऊ.

Scanned with OKEN Scanner

(12) प्रकरण बारावे

* दिवसः द्वादशः - सत्ययोगः (सत्ययोग)

ब्रम्हदेवी उवाच -

ये भक्ताः अनन्यश्रद्धया तव शरणं यान्ति, ते सत्यवचनिन इव दृश्यन्ते ।

श्रीपुरंदर उवाच -

आम्, मम भक्ताः इंद्रदेवसमाः ।

* मराठी भाषांतर

ब्रम्हदेवी : हे पुरंदर, जे भक्त मन एकाग्र करून श्रद्धायुक्त अंतःकरणाने तुला शरण येतात, मला असे वाटते की ते सत्यवचनीच असतील.

श्री पुरंदर : होय, माझे भक्त इंद्रेवासारखे सत्यवचनीच असतात.

* अर्थस्पष्टिकरण

बाराव्या दिवशी भवानीमाता आपल्या गणेशरूपी पुरंदराच्या भक्तांचा गौरव करतात.

• जो भक्त मन पूर्ण एकाग्र करून इतर कुणाच्याही आधाराशिवाय, केवळ परमेश्वरालाच शरण जातो - तोच खरा सत्यवचनी आहे.

श्री पुरंदर सांगतात की हे भक्त माझ्यासाठी इंद्रच आहेत.

( जे लोक पूर्वजन्मी इंद्र होते व पुण्यक्षय आल्याने मृत्युलोक मिळाला ते पूर्वसंस्कारानुसार पुरंदरभक्तच बनतात)

Scanned with OKEN Scanner

* तत्वज्ञान

1) सत्ययोग
→ सत्यवचनांशी एकनिष्ठ राहून देवाला शरण जाणे हाच सत्ययोग आहे. (सत्यमेव जयते)

2) भक्ताची महत्ता
→ सत्यनिष्ठ भक्ताचे वचन, विचार व कृती या सर्व गोष्टी परमेश्वराला प्रिय असतात.

3) इंद्रसमान भक्त
→ इंद्रपद हा फक्त सत्तेचा विषय नाही तर तो भक्ताच्या परिपू समर्पणाचा विषय आहे.

* जीवनातील उपयोग

1) श्रद्धेची शक्ती
→ जीवनात अडचणी येतात, पण दृढ श्रद्धा ठेवली तरच ईश्वर कृपा करतात.

2) सत्याशी बांधिलकी
→ खोटेपणा, फसवणूक यापासून दूर राहिल्याशिवाय खरी भक्ती साध्य होत नाही.

3) ~~मनात दृढ~~ एकनिष्ठता
→ मनात कोणतीही शंका न ठेवता फक्त आपले राजे श्री पुरंदर महाराज हेच आपले देव, गुरू व पिता आहेत म्हणजे खरी एकनिष्ठता व आत्मविश्वास होय.

* आता आपण पुढील प्रकरणात सृष्टीनिर्मितीचे रहस्य जाणून घेऊ.

Page No: २४

# भाग पाच
## त्रिगुणात्मक सृष्टी व प्रिय धाम
### (आस्तिकांसाठीही)

(13) प्रकरण तेरावे

* दिवसः त्रयोदशः - सृष्टेः प्रयोजनम्

ब्रम्हदेवी उवाच -
हे सुरेंद्र! सृष्टेः प्रयोजनं किम?

श्रीपुरन्दर उवाच -
अहं सदा एकाकी आसीत् । अतः मम क्रीडार्थे त्रिगुणात्मकं विश्वं निर्मितम् ।

* मराठी भाषांतर
ब्रम्हदेवी : हे सुरेंद्र, हे जग निर्माण करण्यामागील तुमची योजना नेमकी काय आहे?

श्रीपुरंदर : मी एकमेव (एकटाच) असल्यामुळे या त्रिगुणात्म विश्वाची निर्मिती मी माझ्या मनोरंजनासाठी केली.

अर्थस्पष्टीकरण

आदिमाया अंबाबाईने तेराव्या दिवशी बाल्यभावनेने देवाला प्रश्न विचारला, की तुम्ही ही सृष्टी का निर्माण केलीत।
पुरंदर म्हणाले - स्वतःच्या आनंदासाठी आणि दैवी लीलेने अज्ञानी जीवांना तारण्यासाठी मी विश्वनिर्मिती केली.

Scanned with OKEN Scanner

तत्त्वज्ञान

1) विश्वनिर्मितीचे कारण
→ परमेश्वराने स्वतःच्या मनोरंजनासाठी हे विश्व व समयचक्र निर्माण केले.

2) त्रिगुणात्मक विश्व
→ विश्वातील प्रत्येक जीव व प्रत्येक घटना सत्त्व, रज, तम या त्रिगुणांच्या आधारावर आहे.

3) लीला सिद्धांत
→ a) दैवी दृष्टीने विश्व हे एखाद्या नाटकासारखे किंवा चित्रपटासारखे आहे. यात देव नायक, विश्व रंगमंच किंवा चित्रपटाची स्क्रीन तर इतर सर्व जीव ही पात्रे आहेत.

b) मानवी दृष्टीने आपले आयुष्य हा एक दैवी खेळच आहे यात स्वतः जीव हा शिवरूपी खेळाडू आहे तर स्वतः परमेश्वर इंद्रदेव हे विश्वरूपी प्रतिस्पर्धी आहेत.

जीवनातील उपयोग

1) जीवनाचा अर्थ
→ आपण ईश्वरी लीलेचा भाग आहोत

2) त्रिगुणांची ओळख
→ आपल्या स्वभावातील सात्विक, राजसिक व तमोगुण यांचे भान ठेवले तरच आत्मविकास शक्य होतो.

3) आनंदाने जगणे
→ जीवनात अतिगंभीरता न ठेवता शांती-प्रेम व आनंद या भावनांवर लक्ष केंद्रित करून जगणे.

★ पुढील प्रकरणात आपण गणपती बाप्पाचे स्वरूप जाणू.

Scanned with OKEN Scanner

(14) प्रकरण चौदावे

* विषयः चतुर्दशः – त्रिगुणमूर्तीः (त्रैमूर्ती)
ब्रम्हदेवी उवाच –
ॐ कारात् ब्रम्हा विष्णुः कालश्चोत्पन्नाः । स ॐ कारः ~~त्व~~ त्वमेव किम ?

श्रीपुरंदर उवाच –
आम् देवी । अहमेव महागणपति ।

* मराठी भाषांतर
ब्रम्हदेवीः ॐ या ध्वनीपासून ब्रम्हा, विष्णू व महाकाळ यांची उत्पत्ती झाली, तो ॐ कार म्हणजे तुम्हीच का ?

श्री पुरंदरः होय कालेश्वरी, तो महागणपती म्हणजे मीच.

* अर्थस्पष्टीकरण
चौदाव्या दिवशी ब्रम्हदेवी विचारतात की ज्या ॐकार ध्वनीपासून त्रिगुण भगवानांची उत्पत्ती झाली तो ध्वनी म्हणजे तुम्हीच का ?
पुरंदरांनी स्पष्ट केले की तो महागणपती मीच आहे.

* तत्त्वज्ञान

1) ॐ काराचे रूप
→ ॐ हे विश्वोत्पत्तीचे बीजमंत्रस्वरूप आहे.

2) त्रिगुणात्मक अधिष्ठान
→ सत्व, रज व गतियुक्त तम हे तीन गुण ॐकारेश्वर प्रकट करतात

3) गणेश तत्त्व
→ महागणपती म्हणजे सर्व ऊर्जा, सर्व गुण सर्व शक्ती आणि सिद्धींचे एकत्रित असे प्रथमपूजनीय अधिष्ठान.

* जीवनातील उपयोग

1) ॐकार जप
→ ॐ चा जप केल्याने मन, बुद्धी व शरीर या तिन्हींचे संतुलन साधले जाते.

2) त्रिगुणांची जाणीव
→ त्रिगुणात्म त्रैमूर्ती असे दत्तमहाराज यांचेही आराध्य असणारे श्रीगणेश हे स्वयं भगवान इंद्रच आहेत.

3) समग्र दृष्टीकोन
→ त्रिदेव हे स्वतः इंद्रभगवान पुरंदरच आहेत.

* पुढील प्रकरणात आपण गोमातेचे महत्त्व जाणू.

Scanned with OKEN Scanner

(15) प्रकरण पंधरावे

*

* दिवसः पंचदशः - सर्वोत्तमयोगः (उत्तम योग)

ब्रह्मदेवी उवाच -

तव प्रियं धाम किम्?

श्रीपुरंदर उवाच -

गोलोकमेव मम प्रियतमतं धाम।

* मराठी भाषांतर

ब्रह्मदेवी : हे पुरंदर, तुझे सर्वात प्रिय घर कोणते?

श्री पुरंदर : गोलोक (गोमाता - गोवंश - गाय) हे माझे सर्वात आवडते घर आहे.

* अर्थस्पष्टिकरण

पंधराव्या दिवशी मातेला उत्सुकता होती की देवाचे सर्वात प्रिय निवासस्थान कोणते?

वासुदेव पुरंदर उत्तर देतात की -

- त्यांचे सर्वात प्रिय धाम म्हणजे गोलोक
- गोलोक हे केवळ पारलौकिक स्थान नव्हे तर गाय, म्हैस इत्यादी गोवंश हेच देवाचे निवासस्थान आहे.

Scanned with OKEN Scanner

* तत्त्वज्ञान

1) गोलोकाचे स्वरूप
→ गोलोक हे पुरेश्वरांचे प्रिय स्थान असल्याने ते कधीच नष्ट होत नाही.

2) सर्वोत्तम योग
→ जिथे जीवात्मा परमात्म्याशी अखंड एकरूप असतो असा सर्वोत्तम योग म्हणजे गोलोकप्राप्ती.

3) अनंत प्रेम
→ गोलोकाचे वैशिष्ट्य म्हणजे दिव्य मधुरत्व - अमर प्रेम.

* जीवनातील उपयोग

1) ध्यानातील धाम
→ भक्तीत जेव्हा मन पूर्ण शुद्ध होते तेव्हा भक्ताला स्वतःच्या अंतःकरणात गोलोकाचा अनुभव येतो.

2) प्रीतिवास
→ जिथे भक्त तिथे देव.

3) गोपालन
→ गोवंश हे गोलोकाचे मर्त्य स्वरूप आहे.

* आता पुढील प्रकरणात आपण चांगले व वाईट यांतील फरक शिकू.

Scanned with OKEN Scanner

भाग सहा

धर्म, श्रद्धा व राज्याभिषेक



(राजा व राजनेत्यांसाठीही)

(16) प्रकरण सोळावे

* दिवसः षोडशः – देवदुष्टयोर्भेद (देव-दुष्ट-भेद)

ब्रह्मदेवी उवाच –
हे परमश्रेष्ठः ! देवदुष्टयोः भेदः कथं जायते ?

श्रीपुरंदर उवाच –
दानशीलता दैवी गुणः । स्वार्थ असुरदोषः ।

* मराठी भाषांतर

ब्रह्मदेवी : हे सर्वश्रेष्ठ देवा, चांगला व वाईट व्यक्ती यांतील फरक कसा ओळखावा

श्री पुरंदर : दानशीलता हा चांगल्या माणसाचा दैवी गुण आहे व स्वार्थ हा दुष्टाचा अवगुण आहे.

* अर्थस्पष्टीकरण

मातारांणीने सोळाव्या दिवशी एक महत्त्वाचा प्रश्न विचारला देव आणि दुष्ट (दानव) यांच्यात नेमका फरक काय आहे ?

श्री पुरंदर सांगतात –

• देव म्हणजे दानशील, म्हणजेच इतरांसाठी सदैव तत्पर असणारा

• दुष्ट म्हणजे स्वार्थी – जो फक्त स्वतःचाच विचार करतो.

• कोणाच्याही बाह्य स्वरूपामुळे नव्हे, तर त्याच्या वृत्तीमुळे तो देव – मनुष्य – राक्षस ठरतो.

Scanned with OKEN Scanner

* तत्त्वज्ञान

1) दानशूरता
→ निःस्वार्थ दान, करुणा आणि दुर्बलांची सेवा हेच देवत्त्वाचे चिन्ह आहे.

2) स्वार्थ
→ इतरांचे नुकसान करून स्वतःचा फायदा बघणे – ही दुष्ट वृत्ती आहे.

3) देवत्वाचा खरा मापदंड
→ ~~देवत्वा~~ देवत्व म्हणजे केवळ अलौकिक शक्तीच नव्हे, तर इतरांसाठी जगण्याची वृत्ती होय.

* जीवनातील उपयोग

1) स्वार्थत्याग –
→ आपण जितके दानशील व करुणामय राहू तितके आपण देवासारखे बनतो.

2) सेवाभाव –
→ दुर्बल जीवाची लहानशी मदतही दानशीलतेचाच भाग आहे अशी सेवा शब्दांनी, कृतीने, ज्ञानदानाने, वेळेने किंवा धनाने असू शकते.

3) स्वभाव परीक्षण –
→ प्रत्येकाने हे तपासले पाहिजे की आपण नैतिक मूल्ये पाळत आहोत की नाही?

* पुढील प्रकरणात पुरंदर भक्तांसाठी काय करतात ते पाहू.

Scanned with OKEN Scanner

(17) प्रकरण सतरावे

* दिवसः सप्तदशः - श्रद्धा (श्रद्धाभाव)
ब्रम्हदेवी उवाच -
पुरंदर ! शक्तिमत् दुष्टात् सामान्यः जनः कथं रक्षेत् ?

श्रीपुरंदर उवाच -
मम भक्ताः मया नित्यं रक्ष्यन्ते । अहमेव विश्वनाथः ।

* मराठी भाषांतर
ब्रम्हदेवी : पुरंदरा, सामान्य माणसाने शक्तिशाली दुष्ट व्यक्तीपासून स्वतःचे रक्षण कसे करावे ?

श्री पुरंदर : माझ्या भक्तावर मी संकट येऊच देत नाही, कारण मीच विश्वाचा कर्ता करविता आहे.

* अर्थस्पष्टीकरण
जगन्मातेचा आपल्या लेकरांसाठीचा प्रश्न म्हणजे प्रत्येक माणसाच्या मनातील शंका आहे.
पुरंदर सांगतात - माझ्या भक्तावर कुणाचीही वक्रदृष्टी पडूच शकत नाही.
• श्रद्धाभाव हा भक्तासाठी अभेद्य कवच आहे.

Scanned with OKEN Scanner

तत्वज्ञान

1) श्रद्धेचे सामर्थ्य -
→ श्रद्धा म्हणजे अंधविश्वास नव्हे, तर देवाच्या सामर्थ्याव डोळस आणि निश्चल विश्वास होय.

2) भक्तांचे रक्षण -
→ देव आपल्या भक्तांचे रक्षक असतात.

3) दुष्टांचा प्रभाव -
→ दुष्ट व्यक्ती कितीही बलवान वाटला तरी देवापुढे त्याची शक्ती क्षणभंगूरच असते.

# जीवनातील उपयोग

1) ~~निर्भ~~ निर्भयता
→ इंद्रवदन पुरंदरावर श्रद्धा असेल तर भक्त निर्भय बनते

2) श्रद्धाकवच
→ कठीण प्रसंगी श्रद्धाच आपले रक्षण करते.

3) देवावर अवलंबून राहणे.
→ 'मी एकटा नाही, देव माझ्यासोबत आहे' असा भाव ठेवला की आपण निर्भय ~~हे~~ होऊन कोणत्याही भितीवर विजय मिळतो.

# आता पुढील प्रकरणात श्री पुरंदरांनी पुढील महायुगासाठी नेमलेला अवतार कोणता ते पाहू.

Scanned with OKEN Scanner

(18) प्रकरण अठरावे

★ दिवसः अष्टादशः - राज्याभिषेकः (राज्याभिषेक)
ब्रम्हदेवी उवाच -
प्रभो! युगान्ते त्वया इन्द्रपदं त्यक्तं चेत्, अस्माकं राजा कः भविष्यति ?

श्रीपुरंदर उवाच -
प्रल्हादवंशी बली भावी राजा भविष्यति।

★ मराठी भाषांतर
ब्रम्हदेवी : प्रभु, या युगाच्या शेवटी तुम्ही वर्तमान इंद्रपदाचा त्याग करून ~~व~~ वरिष्ठ व्हाल तेव्हा आमचा राजा कोण होईल

श्री पुरंदर : प्रल्हादवंशी बळीराजा हा आपला भावी राजा (म्हणजे सध्याचा राजकुमार) आहे.

★ अर्थस्पष्टीकरण
देवींचा प्रश्न आपल्या भविष्यासंबंधी आहे.
भगवान उत्तरतात की बळीराजा पुढील युगात इंद्रपद भूषवेल. इंद्रावतार महाराज बळी हे सध्या सूतक लोकात राहातात.

तत्त्वज्ञान

1) राज्य व जबाबदारी

→ इंद्रपद म्हणजे केवळ सत्ता नसून जगताचे रक्षण आणि पालन पोषण करण्याची जबाबदारी असते.

2) बळीराजाचे स्थान

→ बळीमहाराज हे भक्तप्रवर प्रल्हाद महाराजांचे नातू आहेत. त्यांचा त्याग, दानशीलता व धर्मनिष्ठा यामुळे ते अमरेंद्र झाले.

3) दैवी नियोजन

→ सत्ता कोणाच्या हातात असावी हे दैवी नियोजन ठरवते, त्यामुळे ती दुष्टांच्या हाती राहात नाही.

उपसंहार

ही भागवत गीता शिकवते की प्रत्येक जीव हा ईश्वरी अंश आहे. ईश्वरावर प्रत्येक जीवाचा अधिकार आहे

|| इति श्री इंद्र पुरंदरगीता समाप्त ||

Scanned with OKEN Scanner